**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –2, March – 2011**
**ISSN:-** 2230-7850 Available online at www.isrj.net

**ORIGINAL ARTICLE**

# धुळे जिल्ह्यातील राजवटी आणि परंपरा

**अनिल माणिकराव बैसाणे**

इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे.

**प्रास्ताविक :**

आपल्या धुळे जिल्ह्याला उज्ज्वल अशी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्राप्रमाणेच धुळे जिल्ह्याने वेगवेगळ्या राजवटी पाहिल्या आहेत? विविध परंपरांची जपणूक केली आहे. धुळे जिल्ह्याचे हे गाव पांझरा नदीच्या कालावर अतिशय प्राचीन काळापासून वसलेलं असल्याचा ऐतिहासिक वृत्तामध्ये उल्लेख आहे. धुळे शहर आणि जिल्हा परिसरात अश्मयुगीन आदिमानवाच्या वसाहती होत्या. या काळातील आदिमानवाचे अस्तित्व दाखविणारे अवशेष मिळाले आहेत. शहरात जुने धुळे जेथे वसलेले आहे त्याठिकाणी ताम्रपाषाणयुगीन वसाहत होती. मिळालेल्या मुर्त्या, शिल्पे काही लेणी व ताम्रपट यावरून ते सिध्द होते. या परिसरात उत्तर हडप्पाकालीन अनेक वसाहतींचाही शोध लागला आहे. हे लोक तापी व तिच्या उपनद्यांच्या खोऱ्यातील संपन्न प्रदेशात येवून स्थायिक झाले होते. आपल्या जिल्ह्यात ताम्रपाषाण युगातील सावळदा, उत्तर हडप्पा, माळवा, जोर्वे या संस्कृतीच्या वसाहती होत्या. धुळे जिल्हा खानदेशचा एक भाग आहे. या प्रदेशास प्राचीन कालखंडात असिक किंवा ऋषीक असे म्हटले जात असे. इसवी सनाच्या पूर्व काळात येथे आर्यांनी वसाहत केली होती. वनवासात असतांना सीतेच्या शोधासाठी वानरांना विदर्भ, ऋषीक व महिषक या प्रदेशात जाण्याचे सुग्रीवाने सुचविले होते. तर महाभारतात एकदा ऋषिकांचा उल्लेख विदर्भ व पश्चिम अनुप या देशांबरोबर आणि दुसऱ्यांदा कर्णाने जिंकून घेतलेल्या प्रदेशात अश्मकासहित केलेला आहे. नाशिक येथील सातवाहनकालीन लेणीतील अभिलेखातही ऋषिकांचा उल्लेख आहे. महत्त्वाचे म्हणजे हा पुरावा लिखीत स्वरुपातील असल्याने त्याला फार महत्त्व आहे. ह्या प्रदेशावर सातवाहनांबरोबरच मौर्य, कुशाण, आभिर, वाकाटक, त्रैकुटक, कलचुरी, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, निकुंभ इत्यादींची सत्ता असल्याचे अभिलेखे, पुराणग्रंथ व ताम्रपटातून वाचावयास मिळते.

**धुळे जिल्ह्यातील राजवटी**

राष्ट्रकुट वंशाचे तर धुळे, तोरखेडे, खर्दे, तळोदा, जवखेडे, पिंपरी येथे ताम्रपट सापडलेले आहेत. राष्ट्रकुटानंतर धुळे जिल्हा परिसरावर देवगिरीच्या यादवांची सत्ता होती. साक्री तालुक्यातील बळसाणे येथील मंदिरे व मठ, शिलालेख, भामेर येथील किल्ला व गुंफा, विखरण येथील पायविहीर तसेच धुळे शहरातील एकविरा ग्रामदेवतेचे जुने बांधकामातले मंदिर, शिरुड येथील कालिकामंदिर ही यादवकालीन उत्कृष्ट उदाहरणे होत. धुळे शहरालगत असलेले लळींग व सोनगीरचे किल्ले, पिंपळनेर येथे सापडलेले अवशेष प्राचीन काळाची साक्ष देतात.

पुढे दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीवर हल्ला चढवून यादवांचा पराभव केला व धुळे परिसराचा हा भाग खिलजी घराण्याच्या वर्चस्वात गेला. तुघलकांच्या काळात फिरोझ तुघलक यानं मात्र पुढं मलिकराजा फारूकी या अरब तरूणास थाळनेर व करवंद असे दोन सुभे बक्षीस म्हणून दिल्याने धुळे गाव त्याच्या ताब्यात आले. त्यावेळी देवपूर व जुने धुळे येथे दोन गढ्या बांधल्या होत्या. पांझरेच्या महापूरानं देवपूरमधील गढी नष्ट झाली. त्यानंतर धुळे गाव मोगलांच्या वर्चस्वात गेले. धुळे, नंदुरबार व जळगाव हे तीन जिल्हे आणि नाशिककडचा काही भाग मिळून मोघलकाळात खानदेश नावाचा सुभा होता. पुढं मराठ्यांनी मोघलांचा पाडाव करून ह्या प्रदेशाचा ताबा मिळविला. शेवटी मराठाशाहीचा अंत होवून ब्रिटिशांचं वर्चस्व प्रस्थापित झालं. धुळे भागावर कॅ. ब्रिग्ज या अंमलदाराची नेमणूक झाली. त्यावेळी जुनेधुळे, देवपूर व मोगलाई असे तीनच भाग होते. नवे धुळे नंतर वसविण्यात आले. हल्ली रजिस्टर कचेरी म्हणून ओळखली जाणारी इमारत ही ब्रिटिश अमदानीतील धुळ्यातील पहिलीच सरकारी इमारत होती. येथेच कॅ. ब्रिग्जंचे ऑफीस होते. न्यु सिटी हायस्कूलच्या मागच्या पटांगणात त्यांची फौज ठेवलेली असे.

धुळे हे गाव दक्षिण भारतातून उत्तर भारतात जाण्याच्या मार्गावर व मुंबई आग्रा या राजमार्गावरील महत्त्वाचे असे मध्यवर्ती ठिकाण होते. म्हणून ब्रिटिशांनी ब-हाणपूर, सुरत, मुंबई येथून व्यापारी व कारागीरांना येथे आर्थिक सवलती देवून आश्रय दिला. तसेच तापी, पांझरा व गिरणा या तिन्ही नद्यांच्या खो-यात वसलेले हे गाव समृद्ध असल्यानं या गावाची वाढ होत राहिली. कॅ. ब्रिग्ज साहेबांनी धुळे शहराची रचना केली. धुळे शहराची वाढ पाहता सेंट्रल रेल्वेने चाळीसगाव पासून जोडले गेले. प्रतापशेठ यांच्या औदार्याने न्यू प्रताप स्पिनींग ॲण्ड विव्हिंग मील सुरू झाल्यानं या परिसराच्या औद्योगिकरणास गती मिळाली.

### धुळे जिल्ह्याची निर्मिती

खानदेश हा मुघल साम्राज्यातील दक्षिण भारतातील सहा सुभ्यांपैकी एक सुभा होता. ब्रिटिश आमदानीत खानदेशचे तीन प्रशासकीय विभाग पाडले. मालेगाव, नांदगाव, बागलाण हे तालुके नाशिक जिल्ह्यास जोडण्यात आले. याचवर्षी स्वतंत्र जिल्हा म्हणून खानदेश अस्तित्वात आला. खानदेश जिल्ह्याचे प्रमुख केंद्र धुळे येथे ठेवण्यात आले. पुढे मात्र ब्रिटिश शासनाने खानदेश जिल्ह्याचे पूर्व खानदेश आणि पश्चिम खानदेश असे विभाजन केल्याने दोन स्वतंत्र जिल्हे अस्तित्वात आलेत. जळगाव हे पूर्व खानदेशतील तर धुळे हे पश्चिम खानदेशातील केंद्र ठेवण्यात आले ? स्वातंत्र्योत्तर काळात भाषावार राज्य पुनर्रचनेच्या धोरणानुसार महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्याचवर्षी डांग गुजरातला जोडून पूर्व खानदेशाचे जळगाव तर पश्चिम खानदेशाचे धुळे जिल्हा असं नामरकण करून धुळे जिल्ह्याची निर्मिती झाली. धुळे जिल्ह्यातील नंदुरबार तालुक्यातील बहुसंख्य आदिवासीचे प्रमाण पाहता नंदुरबार ह्या स्वतंत्र जिल्ह्याची निर्मिती करून शासनाने आदिवासींच्या सर्वांगीण विकासाकडे अधिक लक्ष दिल्याचे दिसते.

देशभर ब्रिटिश अंमल सुरू झाला. अनेक सरदार, राजेरजवाडे यांनी ब्रिटिशांपुढे नमते घेतले मात्र महाराष्ट्रातील आदिवासी जमाती ब्रिटिश राजवटीविरूद्ध लढतच राहिल्या. धुळे जिल्ह्यातील आदिवासी भिल्ल आदिवासींनी जोरदार विरोध केला. कुवर वसावे यांनी नवापूर व कुकरमुंडा परिसरात ब्रिटिश सेनेचा पराभव केला. सातपुडा परिसरात अंकुश नाईक यांनी तर ब्रिटिश खजिन्यांचीच लुटमार चालविली. धुरसिंग नाईक व सुभान्या नाईक यांनी तर सेंधवा घाटच बंद केला.

सत्तावन्नच्या देशव्यापी उठावात तर काझिसिंग नाईक व भिमा नाईक हे भिल्ल क्रांतीकारक विशिष्ट जाणिवेणं ब्रिटिशांविरूद्ध लढलेत. मेजर ईव्हान्सशी आंबापाणी येथे घनघोर लढाई करून आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय आणून दिला. यात स्त्रिया व मुलांचाही सहभाग होता. पुढे तर इंदोरहून मुंबईकडे जाणारा ब्रिटिश साडेसात लाखांचा खजिना सेंधवा घाटात लुटून आपले क्रांतीकार्य या देशतील कोणाही क्रांतीकारकांपासून तसूभरही कमी नसल्याचे दाखवून दिले. भिमा नाईक तर स्वतःला मुघल बादशहाचा प्रतिनिधी समजत असे.राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्याने भारतीयांना स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रभावी व्यासपीठ मिळाले. कॉग्रेसच्या स्थापनेपासूनच धुळ्यात बैठका होवून ठराव पास होत. अभिनव भारत या क्रांतीकारक संघटनेच्या शाखेची बैठक रणदिवे बंधुच्या घरी झाली होती. वंगभंग चळवळीच्या निमित्ताने लो. टिळक धुळ्यात आले होते. न्या. रानडे ह्यांची न्यायाधीश म्हणून धुळे येथे बदली झाली असता खोलगल्लीच्या उत्तर–पश्चिम कोपऱ्यावर असलेल्या घरात त्यांच वास्तव्य होते. त्यांच्या सहवासाने धुळ्यातील कार्यकर्ते चांगलेच भारावले होते. कोर्टाच्या कामानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर दोन वेळा धुळे येथे येवून गेलेत. पहिल्या भेटीत काकासाहेब बर्वे यांच्याकडे थांबून राजेंद्र छात्रालय व चोखामेळा बोर्डिंगला भेट दिली आणि विजयानंद थियटरमध्ये झालेल्या भाषणात दलितांना जागृत राहण्याचा कानमंत्र दिला. दुसऱ्या भेटीत बार लायब्ररी व राजवाडे संशोधन मंदिरास भेट दिली व रात्री शाळा क्र. 5 च्या आवारात जनतेसमोर भाषण केले. म. गांधीनी कस्तुरबा व श्री. महादेवभाईसोबत धुळे जिल्ह्याचा दौरा केला. शिंदखेडा, शहादा, सोनगीर, धुळे, निजामपूर, पिंपळनेर, नेर, साक्री याठिकाणी त्यांच्या सभा झाल्यात. कॅ. विश्वासराव देवरे यांनी लो. उद्यानात शिबीर घेवून कायदेभंग चळवळीकरिता स्वयंसेवक घडविलेत. याबरोबरच आपल्या जिल्ह्यात पं. जवाहरलाल नेहरू, बाबु राजेंद्रप्रसाद, स्वातंत्र्यवीर सावरकर, ठक्कर बाप्पा, मुरारजीभाई देसाई, जयप्रकाश नारायण, क्रांतीसिंह नाना पाटील, सरदार वल्लभभाई पटेल, नेताजी सुभाषचंद्र बोस, राजगोपालाचारी, सेनापती बापट, सरहद्द गांधी, जमनालालजी बजाज, काका कालेलकर इत्यादी नामवंत नेते व विचारवंत, सामाजिक सुधारक येवून गेलेत. त्यांच्या विचारांनी भारावलेला आपला धुळे जिल्हा स्वातंत्र्य आंदोलनात अग्रेसर राहिला आहे. जिल्ह्यात सशस्त्र क्रांतीकारकांचेही कार्य मोठे आहे. श्री. व्यंकटराव अण्णांनी शिरपूर व श्री. विष्णू सिताराम पाटील यांनी चिमठाणे येथील बंगले जाळून ब्रिटिश शासनास हादरा दिला. असेच प्रकार इतरत्रही झालेत. त्यात पिंपळनेर येथे पोलीस स्टेशन जाळले. जिल्ह्यात तारा तोडून दळवणवळण बंद पाडण्याचा मोठा प्रयत्न झाला. ऑगस्ट क्रांतीमध्ये क्रांतीकार्यातील सहभागामुळे साने गुरूजी धुळे कारागृहात होते. मुक्ततेनंतर ते भूमिगत झालेत. त्यामुळे कार्यकर्त्यांना मोठी प्रेरण मिळाली. डॉ. उत्तमराव पाटील व लिलाताई पाटील हेही भूमिगत झालेत व सातारा येथील क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिसरकारचे सेनानी बनलेत. प्रतिसरकार चालवण्यिात आर्थिक सहकार्य मिळावे म्हणून त्यांनी आपल्या सात सहकार्यांमार्फत चिमठाणे ता. शिंदखेडा येथे धुळ्याहून नंदुरबारला जात असलेला खजिना लुटला आणि साताऱ्यास पाठवून प्रतिसरकार जिवंत ठेवले.

नंदुरबार येथे तर विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी तहसील कचेरीवर तिरंगा फडकविण्यासाठी मिरवणूक काढली होती. त्याप्रसंगी अवघ्या 16 वर्षाच्या शिरीषकुमारने आपल्या मित्रांसह हौतात्म्ये पत्करले? या वीर पुत्राच्या बलिदानाने तर भारतीयाचे हृदय हेलावून गेले.

इतिहास जिवंत ठेवण्याची ही परंपरा आपल्या जिल्ह्याची उज्वल आहे. कै. राजवाडे इतिहास संशोधन मंदिराचे उद्‌घाटन इंदूरच्या महाराणी होळकर यांच्या शुभ हस्ते झाले तर विनोबा भावे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. यावेळेस लोकमान्य उद्यानात विराट सभा झाली. प्रक्षोभ नको म्हणून पोलिसांनी विनोबांना नंतर जळगाव येथे अटक करून धुळे कारागृहात आणले. यावेळी धुळे कारागृहात साने गुरूजी, येवल्याचे आपटे गुरूजी, लक्ष्मणशास्त्री जोशी, जमनालालजी बजाज इत्यादी क्रांतीकारक व नेते होते. कारागृहात दर आठवड्यास विनोबांची गीता प्रवचने होत. साने गुरूजींनी शब्दबद्ध केलेली 'गीता प्रवचन' पुस्तक रुपानं प्रसिद्ध झाले. राजवाडे संशोधन मंदिर, श्री. समर्थ वाग्देवता मंदिर, म. गांधी तत्त्वज्ञान केंद्र, कस्तुरबा अभ्यास कुटीर, चिमठाणे येथील क्रांतीस्मारक, नंदुरबार येथील हुतात्मा स्मारक, बळसाणे येथील पुरातन मंदिरे, थाळनेर येथील ऐतिहासिक वास्तु यांच्या रुपाने ऐतिहासिक बहुमोल ठेवाच जपला जातोय.

पांझरा नदीच्या काठावर विजय व्यायाम शाळा, पाताळे घाट, अंजानशा, जीवनराम जोधराजघाट, मारुती मंदिर, एकविरादेवी मंदिर ही स्थळे रमणीय आहेत. शहरात मध्यभागी सरदार पटेल उद्यान असून या शहराचा नगररचनेच्या दृष्टीने भारतात दुसऱ्या क्रमांकाचे शहर म्हणून विश्वकोषातील उल्लेख अभिमानास्पद होय. आज विविध शैक्षणिक सुविधांमुळे एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र म्हणून धुळे जिल्ह्याकडे पाहिले जातें. असा सर्वच दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण असलेला आमचा धुळे जिल्ह्या.

**संदर्भसूची :**

*1.* जळगाव जिल्हा ***गॅझेटिअर***
*2.* धुळे जिल्हा ***गॅझेटिअर***
*3.* डॉ. उत्तमराव पाटील, ***क्रांतीपर्व.***
4. ***स्वतंत्रता दिन विशेषांक–97*** (संपा. रघुनंदन शर्मा)
5. ***सहभाग स्वातंत्र्य संग्रामातील*** – श्री. कांतीलाल गुजराती
6. ***महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे***, डॉ. वि. गो. खोबरेकर
7. ***काजीसिंग नाईक,*** प्रा. चामुलाल राठवा.



**अनिल माणिकराव बैसाण**
इतिहास विभाग प्रमुख,
झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे.